# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.६३१८/२०२२/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कन्हैयालाल पाठक,<br>रा.पाठक मोटर्स, औंदाणे शिवार, यशवंत नगर, ताहाराबाद रोड, मु.पो.सटाणा, ता.बागलाण, जि.नाशिक ४२३ ३०१. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे.<br>ता.बागलाण, जि.नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.).<br>पंचायत समिती, बागलाण.<br>ता.बागलाण, जि.नाशिक. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**विवेचन**

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.२१/०६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

औंदाणे ग्रामपंचायत हद्दीतील यशवंत नगर परिसरातील "पाठक मोटर्स" शोरुमच्या पश्चिमेकडील टाकण्यात आलेली पाईप लाईन बाबत खालीलप्रमाणे माहिती देण्यात यावी.- १) पाईप लाईन टाकणेबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव त्याबद्दलची माहिती. २) जागा मालकाचे / प्लॉट धारकाचे संमतीपत्र किंवा करारपत्र त्याबद्दलची माहिती. ३) पाईप लाईन साठी निधी राज्य शासनाने / जिल्हा परिषदेने किंवा कोणी दिला त्याबाबतचे मंजूरीपत्राची माहिती. ४) पाईप लाईन टाकण्याबाबत दैनिकात प्रकाशित केलेली जाहिरात प्रत.

२. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१२/०२/२०२५ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण, जि.नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

३. आयोगाच्या उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण, जि.नाशिक श्री.वाय.आर.सुर्यवंशी यांनी आयोगाकडे दि.०२/०७/२०२५ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्री.संजय कन्हैयालाल पाठक रा.C/O पाठक मोटर्स, यशवंत नगर, औंदाणे यांनी दि.२१/०६/२०२२ रोजीच्या माहिती अधिकार अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती मुदतीत तयार करुन ग्रामपंचायत कर्मचारी मार्फत व्यक्तिश: अर्जदारास पोहोच करणेस पाठविले असता अर्जदार यांनी ती घेण्यास नकार दिला. त्यानंतर माहिती घेवून जाणेबाबत अर्जदारास वेळोवेळी तोंडी कळविणेत आले तरीही अर्जदार यांनी माहिती घेतली नाही. शेवटी दि.११/१०/२०२२ रोजी रजिस्टर पोस्टाने सदरची माहिती अर्जदार यांचे पत्त्यावर पाठविण्यात आली. परंतू अर्जदार यांनी सदरची माहिती घेण्यास नकार दिल्याने सदर माहिती उलटटपाली ग्रामपंचायतीकडे दि.०२/११/२०२२ रोजी परत आली. व त्यानंतर अर्जदार यांनी ग्रामपंचायतीला याबाबत कुठलाही पत्रव्यवहार न करता किंवा कल्पना न देता आपलेकडे अपिल दाखल केले. मी जन माहिती अधिकारी या नात्याने अर्जदार यांनी मागितलेली माहिती मुदतीत

देण्याचा पुरेपुर प्रयत्न केलेला असून माहिती न देण्याचा माझा कोणताही हेतू नव्हता. परंतू अर्जदार यांन माहिती स्वीकारली नाही त्यामुळे माझा खुलासा मान्य होवून माझ्याविरुध्द कोणतीही कार्यवाही करु नये ही नम्र विनंती.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण श्री.वाय.आर.सुर्यवंशी यांनी त्यांच्या खुलाशात असे नमूद केले आहे की, श्री.संजय कन्हैयालाल पाठक रा.C/O पाठक मोटर्स, यशवंत नगर, औंदाणे यांनी दि.२१/०६/२०२२ रोजीच्या माहिती अधिकार अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती मुदतीत तयार करुन ग्रामपंचायत कर्मचारी मार्फत व्यक्तिश: अर्जदारास पोहोच करणेस पाठविले असता अर्जदार यांनी ती घेण्यास नकार दिला परंतू याबाबत कोणतेही कागदपत्रे / पुरावा त्यांनी आयोगाकडे खुलाशासोबत सादर केल्याचे दिसून येत नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, अपिलार्थी यांच्या दि.२१/०६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण श्री.वाय.आर.सुर्यवंशी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती / उत्तर दिलेले नाही. तद्नंतर विलंबाने दि.११/१०/२०२२ च्या पत्रान्वये अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविल्याचे दिसून येते व सदर माहितीचे पाकीट अपिलार्थी यांनी स्वीकारले नसल्याचे पोस्टाच्या पाकीटावरील Refused या शिक्क्यावरुन दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण श्री.वाय.आर.सुर्यवंशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) चे उल्लंघन केले असून आयोगाकडे सादर केलेला खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, औंदाणे ता.बागलाण, जि.नाशिक श्री.वाय.आर.सुर्यवंशी यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.६३१८/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण ता.बागलाण, जि.नाशिक.

---

जावक क्र. २९५४ दिनांक :- 24 MAR 2026

---